| MHRG040017772020 | **विशेष दिवाणी दावा क्र. १९४/२०२०**<br>सुधीर गोयल<br>वि.<br>चौथ्या धाया कसूकर वगैरे |
| --- | --- |

## <u>अर्ज नि. २९ वरील आदेश</u>

वादीनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाखल केला आहे. वादीचे म्हणणे असे आहे की, वादीने मौजे बेलोंडेखार, ता. उरण, जि. रायगड येथील सर्व्हे क्र. १०८, हिस्सा क्र. ५ या जमिनीची खरेदी प्रतिवादींकडून करण्याचे ठरविले होते. त्यानुसार प्रतिवादींनी वादीच्या लाभात बयाना पावती निष्पादित केली होती. तथापि, प्रतिवादी विक्रीखत करून देण्यास तयार नसल्याने वादीने त्यांच्याविरुद्ध पोलिस तक्रार दाखल केली.

२. त्यानंतर वादीने दिनांक २१/१०/२०२० रोजी प्रतिवादींविरुद्ध Specific Performance मिळण्यासाठी सदर दावा दाखल केला. दावा दाखल झाल्यापासून बराच कालावधी उलटून गेला असून प्रतिवादींनी अद्याप लेखी जबाब दाखल केलेला नाही.

३. वादीचे पुढील म्हणणे असे आहे की, दावा व मनाई अर्ज तयार करताना टंकलेखनातील (typographical) चुकीमुळे दाव्याच्या मालमत्तेचे गावाचे नाव चुकीने “दादरपाडा” असे नमूद झाले आहे. प्रत्यक्षात वादग्रस्त मालमत्ता मौजे “बेलोंडेखार”, ता. उरण, जि. रायगड येथे स्थित आहे. त्यामुळे दावा व मनाई अर्जामध्ये ज्या–ज्या ठिकाणी “दादरपाडा” असा उल्लेख आलेला आहे, त्या सर्व ठिकाणी त्याऐवजी “बेलोंडेखार” असा उल्लेख वाचण्यात व समजण्यात यावा, अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

४. सदर दुरुस्ती ही केवळ टंकलेखनातील चूक दुरुस्त करण्यापुरती

असून वादाचे स्वरूप किंवा कारणे बदलणारी नाही. न्यायाच्या हितासाठी दावा व मनाई अर्जामध्ये आवश्यक सदर प्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी विनंती वादीने सदर अर्जाद्वारे केली आहे.

५. प्रतिवादिनी सदर अर्जावर म्हणणे दाखल करून हरकत घेतली आहे. प्रतिवादिनी योग्य ते आदेश पारित करावेत असे कथन केले आहे.

६. विद्यमान वकिलांचा युक्तिवाद ऐकला व अभिलेखाचे अवलोकन केले, तसेच मी अर्जातील मजकूर, दाव्यातील नोंदी व उपलब्ध कागदपत्रांचा विचार केला. अर्जदाराने दावा व मनाई अर्जामध्ये दुरुस्ती करण्याची परवानगी मागितली आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, दावा तयार करताना टंकलेखनाच्या चुकीमुळे वादग्रस्त मालमत्तेचे गावाचे नाव “दादरपाडा” असे नमूद झाले असून प्रत्यक्षात मालमत्ता मौजे “बेलोंडेखार”, ता. उरण, जि. रायगड येथे स्थित आहे.

७. अर्जातील प्रस्तावित दुरुस्तीचे अवलोकन करता, ती केवळ गावाच्या नावासंबंधीची चूक दुरुस्त करण्यापुरती मर्यादित असल्याचे दिसून येते. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे मूळ स्वरूप, कारणे अथवा मागितलेल्या दिलास्यामध्ये कोणताही मूलभूत बदल होत नाही. तसेच नवीन दावा किंवा नवीन कारणे निर्माण होत नाहीत.

८. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १७ नुसार, वास्तविक वादग्रस्त मुद्द्याचा प्रभावी व संपूर्ण निकाल लावण्यासाठी आवश्यक असलेली दुरुस्ती न्यायालयास मंजूर करता येते. न्यायालयाचा दृष्टिकोन तांत्रिक बाबींऐवजी दाव्याचा गुणदोषांवर निर्णय होण्याकडे असावा. सदर दुरुस्ती मंजूर केल्यास पक्षकारांमधील वास्तविक वादाचा योग्य प्रकारे निपटारा होण्यास मदत होईल.

९. याशिवाय, प्रतिवादींकडून अद्याप लेखी जबाब दाखल करण्यात आलेला नसल्याचे अर्जातून दिसून येते. त्यामुळे प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींना

कोणतीही अपरिवर्तनीय हानी किंवा अन्याय होणार नाही. उलट, दुरुस्ती नाकारल्यास केवळ टंकलेखनातील चुकीमुळे वास्तविक दाव्याच्या निकालात अडथळा निर्माण होण्याची शक्यता आहे.

१०. त्यामुळे न्यायाच्या हितासाठी व वास्तविक विवादाचा प्रभावी निपटारा करण्यासाठी दावा व मनाई अर्जामध्ये ज्या ठिकाणी "दादरपाडा" असा उल्लेख आहे, त्या ठिकाणी "बेलोंडेखार" असा उल्लेख प्रतिस्थापित करण्याची दुरुस्ती मंजूर करणे उचित व न्यायोचित ठरते. म्हणून अर्ज मंजूर करण्यास पात्र आहे. या अनुषंगाने मी खालील आदेश पारित करीत आहे-

## <u>आदेश</u>

१. वादीचा अर्ज (नि.क्र.२९) मंजूर करण्यात येतो.

२. वादीने सदर दाव्यात दुरुस्ती करुन दुरूस्त दाव्याची प्रत १४ दिवसांच्या कालावधीमध्ये अभिलेखावर सादर करावी.

VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Digitally signed by VAISHALI RAJENDRA HANGARGEKAR
Date: 2026.06.10 17:15:40 +0530

पनवेल. (व्ही. आर. हंगरगेकर)

दिनांक – १०/०६/२०२६. सह दिवाणी न्यायाशीश, व. स्तर, पनवेल.